## सूचना

# उत्तरपत्रिकांच्या वापराबाबत उमेदवारांना विशेष सूचना

(१) उत्तरपत्रिकेवरील माहिती भरण्यासाठी व योग्य उत्तराचे वर्तुळ छायांकित करण्याकरिता फक्त काळ्या शाईचे बॉल पेन वापरावे. हे करतांना दुय्यम प्रतीवरही स्पष्ट खूण दिसण्यासाठी पुरेसा दाब द्यावा.

(२) उत्तर पत्रिकेवरील मजकुरामध्ये बदल करण्यासाठी While Fluid, Blade अथवा तत्सम साधनांचा कोणत्याही परिस्थितीत वापर करू नये.

(३) परीक्षा कालावधीतच उत्तरपत्रिकेवर परीक्षेचे नांव, बैठक क्रमांक (Roll Number), प्रश्नपत्रिका क्रमांक, संच क्रमांक, प्रवेश प्रमाणपत्रावर नमूद केलेला विषयाचा संकेतांक (Subject Code) योग्य ठिकाणी इंग्रजीमध्ये व अचूकपणे नमूद करून विहित ठिकाणी स्वाक्षरी करावी.

(४) उत्तरपत्रिकेवर स्वत:चे नांव अथवा स्वत:ची ओळख पटेल असा कोणताही तपशील नमूद करू नये.

(५) प्रश्नपुस्तिकेत विहित केलेल्या जागीच कच्चे काम करावे. उत्तरपत्रिकेवर अथवा अन्य ठिकाणी कच्चे काम अथवा अन्य कोणताही तपशील नमूद करू नये.

(६) प्रश्नपुस्तिकेवरील इंग्रजी आद्याक्षरातील संच क्रमांक (उदा. A, B, C किंवा D) उत्तरपत्रिकेवर विहित ठिकाणी अचूकपणे नमूद करावा. तसेच, सदर संच क्रमांकाचे संबंधित वर्तुळ अचूकपणे छायांकित करावे.

(७) प्रश्नपुस्तिकेचा संच क्रमांक उत्तरपत्रिकेवर अचूकपणे न नोंदविल्यास शून्य गुण देण्यात येतात.

(८) प्रश्न क्रमांकासमोर दिलेल्या चार पर्यायांपैकी निवडलेल्या उत्तराचे वर्तुळच उत्तरपत्रिकेवर पुढील 'योग्य' मध्ये दर्शविलेल्या पद्धतीप्रमाणे छायांकित करावे. mpscmaterial.com




(९) प्रश्नाचे उत्तर नमूद करण्याकरिता प्रत्येक प्रश्नाकरिता प्रत्येकी एकच वर्तुळ छायांकित करावे. एकापेक्षा अधिक वर्तुळे छायांकित केल्यास अथवा तसा कोणत्याही प्रकारे प्रयत्न केल्यास अशा प्रश्नांच्या उत्तरास गुण दिले जात नाहीत.

(१०) एकदा नमूद केलेले उत्तर खोडता येणार नाही. नमूद केलेले उत्तर खोडून नव्याने नमूद केल्यास अथवा त्यामध्ये कोणत्याही प्रकारचा बदल केल्यास ते तपासले जात नाही.

(११) उमेदवाराने उत्तरपत्रिकेवर नमूद केलेल्या प्रश्नपुस्तिकेच्या संच क्रमांकानुसारच उत्तरपत्रिकांचे संगणक संस्करण केले जाते. संच क्रमांक चुकीचा लिहिल्यास अथवा नमूद केलेल्या संच क्रमांकामध्ये तफावत आढळून आल्यास त्यामुळे होणाऱ्या नुकसानीची जबाबदारी संबंधित उमेदवाराची राहील. परीक्षेनंतर यासंदर्भातील कोणत्याही पत्रव्यवहाराची दखल घेतली जाणार नाही.

(१२) आयोगाने नकारात्मक गुणांकनाची (Negative Marking) पद्धत लागू केली असल्यामुळे प्रश्नांची दिलेल्या चार पर्यायांपैकी सर्वात योग्य उत्तरेच उत्तरपत्रिकेत नमूद करावीत. प्रश्नपत्रिका क्रमांक १ मध्ये १०० प्रश्न, १०० गुण विहित करण्यात आले आहेत. सदर प्रश्नपत्रिकेतील प्रत्येक चुकीच्या उत्तराबद्दल एक चतुर्थांश गुण वजा करण्याची तरतूद करण्यात आली आहे.

(१३) परीक्षेचा कालावधी संपल्यानंतर उमेदवाराने सोडविलेल्या प्रश्नांची, (नोंदविलेल्या उत्तरांची) संख्या अचूकपणे उत्तरपत्रिकेवर विहित ठिकाणी नमूद करणे आवश्यक आहे. त्याकरिता उमेदवारास परीक्षेच्या कालावधीनंतर दोन मिनिटे अतिरिक्त वेळ देण्यात येईल. सदर कालावधीत उमेदवाराने सोडविलेल्या प्रश्नांची, (नोंदविलेल्या उत्तरांची) संख्या मोजून अचूकपणे नमूद करणे आवश्यक आहे. त्याशिवाय अन्य कोणतीही कृती या अतिरिक्त वेळेत करता येणार नाही.